**P.R.O Office ,Crime Branch,Pimpri Chinchwad**
**Address:- Office Of The Commissioner Of Police ,**
**Premlok Park Chinchwad,**
**Maharashtra - 411033**

**प्रेसनोट** **दिनांक – ०६/०७/२०२४**

पोलीस आयुक्तालय, पिंपरी चिंचवड, जिल्हा पोलीस दलातील पोलीस शिपाई भरती प्रक्रिया दिनांक १९/०६/२०२४ रोजी पासुन संत ज्ञानेश्वर क्रिडा संकुल, इंद्रायणीनगर, भोसरी पुणे येथे सुरु आहे. पोलीस भरती करीता प्रथम पुरुष उमेदवार यांना मैदानी चाचणी करीता बोलवण्यात आलेले होते. दिनांक १९/०६/२०२४ ते ०५/०७/२०२४ रोजी पर्यंत एकुण ११,५५३ पुरुष उमेदवार यांना बोलविण्यात आलेले होते त्यापैकी ६,८०१ उमेदवार हजर राहिले असुन ५,९५८ उमेदवार यांनी मैदानी चाचणी पुर्ण केलेली आहे.

आज दिनांक ०६/०७/२०२४ रोजी पासुन महिला उमेदवार यांची मैदानी चाचणीची सुरुवात केली असुन पहिल्या दिवशी १२०० महिला उमेदवार यांना मैदानी चाचणी करीता बोलवण्यात आलेले होते त्यापैकी ८६४ महिला हजर राहिल्या असुन ७२९ महिला उमेदवार यांनी मैदानी चाचणी पुर्ण केलेली आहे.

तसेच दिनांक १९/०६/२०२४ रोजी पासुन जे उमेदवार गैरहजर आहेत व त्यांनी यापुर्वी शारिरीक चाचणीकरीता तारीख वाढवुन घेतलेली नाही, अशा गैरहजर उमेदवार यांना एक संधी उपलब्ध करुन देणे बाबत भरती समितीने निर्णय घेतला असुन, त्यांनी दिनांक १०/०७/२०२४ रोजी प्रवेशपत्रातील सुचने नुसार संत ज्ञानेश्वर क्रिडा संकुल, इंद्रायणीनगर, भोसरी पुणे येथे उपस्थितीत रहावे. पिंपरी चिंचवड पोलीस दलाच्या भरती प्रक्रियेतील उमेदवारांची शारिरीक व मैदानी चाचणीची प्रक्रिया दिनांक १०/०७/२०२४ रोजी पर्यंतच असल्याने तद्नंतर येणाऱ्या उमेदवारांना संधी देण्यात येणार नाही याबाबतची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

जनसंपर्क अधिकारी
पिंपरी चिंचवड, पोलीस आयुक्तालय